आकाशवाणी पुणे

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या

सकाळी ०७.१० वा.

दिनांक - १७/०५/२०१२

वार : गुरूवार

---

ठळक बातम्या

१. कृषी क्षेत्रात ४ टक्के वृद्धि दर गाठण्यासाठी सरकार सर्वतोपरि प्रयत्न करेल पंतप्रधानांचं प्रतिपादन.

२. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या शुल्क सवलत योजनेसाठी, वार्षिक उत्पन्नाची मर्यादा एक लाख रूपये करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.

३. कोयना जलविद्युत प्रकल्पाचा सुवर्ण महोत्सव.

४. जळगांव जिल्ह्यात निमखेडी खुदह्र्थं झालेल्या अपघातात १० जण ठार तर १४ जण जखमी.

□□□□□□□□

पंतप्रधान

बाराव्या पंचवाषिक्र योजनेत उपलब्ध साधनांच्या आधारे, कृषी क्षेत्रातील वृद्धिचा ४ टक्के दर गाठण्यासाठी सरकार सवह्रोपरि प्रयत्न करेल असं पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी म्हटलं आहे. लोकसभेत काल प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना ते म्हणाले, की १२ व्या योजनेत कृषी क्षेत्राच्या वाढीचा दर ४ टक्के राखण्याचं उद्दीष्ट आहे.

नियोजन राज्यमंत्री अश्विनी कुमार यांनी यावेळी सांगितलं की ११ व्या योजनेत कृषी क्षेत्राचा विकास दर ३ पूर्णांक ३ टक्के होता. राष्ट्रीय कृषी विकास योजनेखाली एका वषाह्र शेतीच्या वाढीसाठी ९ हजार २१७ कोटी रूपये देण्यात आले आहेत. याप्रमाणेच अन्य योजना सरकारच्या प्रयत्नांना पूरक ठरत असल्याचं ते म्हणाले.

□□□□□□□□

मंत्रीमंडळ

आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या फी सवलत योजनेसाठी निश्चित केलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा १५ हजार रूपयांवरून एक लाख रूपये करण्याचा निर्णय, काल झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी बैठकीनंतर पत्रकारांना ही माहिती दिली.

राज्यातल्या टंचाइग्रस्त १५ तालुक्यांना, प्रत्येकी १० कोटी रूपये, कायमस्वरूपी उपाययोजनांसाठी देण्यात येणार असल्याचा निर्णयही मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. यामध्ये संगमनेर, जत, पलूस, खटाव, माण, मंगळवेढा पारनेर, भूम, पुरंदर, आटपाडी, कवठे-महांकाळ, खानापूर, मिरज, तासगाव आणि सांगोले या तालुक्यांचा समावेश आहे.

बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार या अधिनियमाची अंमलबजावणी राज्यात सुरू असून वंचित आणि दुबर्ल घटकातल्या बालकांना, विनाअनुदानित शाळांमध्ये, २५ टक्के जागांवर मोफत प्रवेश देण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. या २५ टक्के जागांपैकी निम्म्या जागा सामाजिक आरक्षण म्हणून अनूसूचित जाती, अनूसूचित जमाती, आणि इतर मागासवर्गीयांच्यातून भरण्यात येतील तर उरलेल्या निम्म्या जागा, आर्थिकदृष्ट्या दुबर्ल घटकातून प्राधान्यानं भरण्यात येतील. मात्र एका संवर्गातून पुरेसे अर्जप्राप्त झाले नाहीत, तर दुसऱ्या संवर्गातील मुलांमधून जागा भरण्यात येतील, तसंच मुलींनाही प्राधान्य दिलं जाइल असंही चव्हाण म्हणाले. केंद्र पुरस्कृत हातमाग उद्योगाचं पुनरूज्जीवन आणि सुधारणा योजनेत सहभागी होण्याचा निर्णयही कालच्या बैठकीत घेण्यात आला. या अंतर्गत केंद्र सरकार आणि नाबार्डयांच्यासमवेत सामंजस्य करार करायलाही मान्यता देण्यात आली. वनं, सामाजिक वनिकरण विभाग, आणि वन विकास महामंडळाच्या ६ हजार ५ शे ४६ रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांना कायम करण्याचा निर्णयही मंत्रीमंडळानं घेतला.

□□□□□□□□

विणकर कर्जमाफी

विणकर आणि हातमाग कामगारांची, पन्नास हजार रूपयांपर्यंतची कर्जमाफ करण्याचा निर्णय, राज्य सरकारनं काल जाहीर केला. एकतीस मार्चदोन हजार दहापर्यंत घेतलेल्या कर्जांना ही माफी लागू होणार आहे. खासगी आणि सहकारी क्षेत्रासह, स्वतंत्रपणे काम करणाऱ्या सहा ते सात हजार विणकरांना, या निर्णयाचा लाभ होणार आहे. यासाठीचा ऐंशी टक्के खर्चकेंद्र सरकार, तर उर्वरित वीस टक्के खर्चराज्य सरकार उचलणार असल्याचं राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री नसीम खान यांना सांगितलं.

□□□□□□□□

कृषी पयहन

महाराष्ट्र राज्य कृषी आणि ग्रामीण पयहन महासंघाच्या वतीनं कृषी पयहन गौरव पुरस्कारांचं वितरण काल पुण्यात करण्यात आलं. जागतिक कृषी पयहन दिनाच्या निमित्तानं आयोजित या कायक्रमात साताऱ्याचे अविनाश फरांदे, मुळशीचे रामचंद्र भूमकर, महाबळेश्वरचे विठ्ठल धनावडे, वेंगुर्ल्याचे बाळासाहेब परूळेकर, सोलापूरच्या स्वाती जाधव आणि नागपूरच्या प्रतिभा शिंदे यांना कृषी पयहन गौरव पुरस्कार देण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल आणि श्रीफळ असं पुरस्काराचं स्वरूप आहे.

□□□□□□□□

टंचाइग्रस्तजिल्हा

सांगली जिल्ह्यात टंचाइग्रस्त गावांमध्ये पाण्याची शाश्वत उपाययोजना करण्यासाठी पाणलोट विकास कामांमध्ये उद्योगपती आणि सोसायट्यांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन, जिल्हाधिकारी श्याम वधने यांनी काल केलं आहे. काल जिल्हाधिकारी कायालयात आयोजित उद्योगपती आणि विकास सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.

उद्योगपती आणि सोसायट्यांचा पदाधिकाऱ्यांनी टंचाइग्रस्त भागातील एक गाव दत्तक घेवून तिथले पाझर तलाव, लघु पाटबंधारे प्रकल्प, सिमेंट बंधारे, शिवकालिन पाणी योजना, खाजगी विहिरीमधील गाळ काढणे किंवा दुरूस्तीची कामं हाती घ्यावीत. याकरिता, प्रशासन संपूणहतांत्रिक सहकायहआणि मागदशन करेल, असंही वधने यांनी यावेळी सांगितलं.

□□□□□□□□

कोयना धरण

राज्याच्या प्रगतीमध्ये महत्वाचं योगदान ठरलेल्या, कोयना धरणातून जलविद्युत निमिती सुरू झाली त्याला काल ५० वषह पूणहझाली. पाच दशकांची उत्तम वाटचाल आणि दोन वेळा यशस्वी पार पडलेल्या लेक टॅपिंगमुळं नावलौकिक मिळालेल्या या महत्वाकांक्षी प्रकल्पात २ हजार मेगावॅट विजनिमिती सातत्यानं होत आहेः

महाराष्ट्राचे वैभव असलेल्या आणि राज्याच्या प्रगतीमध्ये महत्वाचे योगदान ठरलेल्या तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर झालेल्या कोयना धरणांतून जलविद्युत निर्मीती सुरू होवून १६ मे रोजी ५० वर्षे पूणहझाली. आजवरची यशस्वी वाटचाल आणि दोन वेळा यशस्वी पार पडलेल्या लेक टॅपींगमुळे साता समुद्रा पलिकडे नावलौकीक पोहोचलेल्या या महत्वाकांक्षी प्रकल्पात दोन हजार मेगावॅट वीज निर्मीती सातत्याने होत आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या दुरदृष्टीतून साकारण्यात आलेल्या कोयना प्रकल्पामुळे महाराष्ट्र, कनाहक, आंध्रपासून अनेक राज्यांची औद्योगिक आणि हरीतक्रांती झाली आहे. कोयना धरणातून वीज निर्मीती करून अरबी

समुद्रात सोडले जाणारे पाणी आता कोकण आणि पुणे-मुंबईकरांना पिण्यासाठी देण्याचा हा प्रकल्प नजीकच्या काळात पूर्ण होईल आणि करोडो लोकांची तहान भागेल. या सुवर्ण महोत्सव साजरा करणाऱ्या कोयना जल विद्युत प्रकल्पाला आणि तंत्रज्ञांच्या कामगिरीला लाख लाख शुभेच्छा देवून नागरीक कृतार्थ होत आहेत.

□□□□□□□□

संदीप कर्णिक साक्ष

मावळमधील शेतकऱ्यांवर गोळीबार करण्याचे आदेश आपण दिले नव्हते, परिस्थितीनुसार तिथं उपस्थित अधिकाऱ्यांनी आपल्या पातळीवर तो निर्णय घेतला अशी साक्ष पुणे जिल्ह्याचे तत्कालीन पोलिस अधिक्षक संदीप कर्णिक यांनी काल चौकशी आयोगापुढं दिली. मावळ गोळीबाराची चौकशी करणाऱ्या आयोगापुढं, गेले दोन दिवस कर्णिक यांची साक्ष सुरू आहे. गेल्या वर्षी नऊ ऑगस्टला मावळमधील शेतकऱ्यांनी बंद जलवाहिनीच्या विरोधात आंदोलन पुकारलं होतं. त्याला हिंसक वळण लागल्यानंतर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तीन शेतकरी ठार झाले होते.

□□□□□□□□

अपघात

जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यातील, निमखेडी खुर्द इथं काल झालेल्या अपघातात, १० जण ठार झाले तर १४ जण जखमी झाले. जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुक्ताबाईंचे दर्शन घेवून जाणाऱ्या भाविकांच्या मिनीडोअरला कंटेनरनं धडक दिल्यामुळं, हा अपघात झाला.

□□□□□□□□

आंदोलन

पेण तालुक्यातील धरमतर खाडी, मासेमारीसाठी खुली करावी, या मागणीसाठी मासेमारांनी केलेलं आंदोलन तीन दिवसानंतरही सुरूच आहे. खाडीच्या काठावर असलेल्या इस्पात आणि पी.एन.पी. या कंपन्यांमुळं मासेमार बाधित झाले आहेत, अशी त्यांची तक्रार आहे.

□□□□□□□□

शेअर

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात काल दिवसअखेर २९८ अंकांची घट होवून बाजार १५ हजार ९७५ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक ८४ अंकांनी घसरला आणि बाजार ४ हजार ८५८ अंकांवर स्थिरावला.

□□□□□□□□□

आय.पी.एल

इंडियन प्रीमिअर लीग अर्थात आय.पी.एल. क्रिकेट स्पर्धेमध्ये काल मुंबईत झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स संघानं मुंबई इंडियन्स संघावर बत्तीस धावांनी विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना कोलकाता नाईट रायडर्स संघानं वीस षटकांत एकशे चाळीस धावा केल्या. मुंबई इंडियन्स संघ सर्वबाद एकशे आठ धावाच करू शकला.

□□□□□□□□□

हवामान

उद्या सकाळपर्यंतच्या हवामान अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रत तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा, उत्तर-मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहील असं पुणे वेधशाळेनं म्हंटल आहे.

□□□□□□□□□